बीड (महाराष्ट्र) । सायं.दैनिक । मराठी । वर्ष – ०२ । अंक – ३६२ । वार मंगळवार दि २३ सप्टेंबर एमएचएमएआर /२०२३/८३९६५ । किंमत ३ रू. । पाने ४

Beed (Maharashtra) Daily Evening Marathi n Year - 02 Issue - 362 Tuesday 23 September 2025 RNI : MAHMAR/2023/83965 Price - 3 Rupees Pages 4

# सायं. दैनिक महाराष्ट्र आरंभ'च्या दणक्याने भक्षक गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर अखेर निलंबित!

## लिंगपिसाट बेडसकरला फक्त निलंबन करून चालणार नाही तर कठोर शिक्षा होऊन फासावर लटकवले पाहिजे?

सायं.दैनिक महाराष्ट्र

आरंभ

संपादक :– दिपक थोरात मो.९८६०८९८५६४




# एसपी साहेब, केज पोलिस ठाण्याचे निरीक्षक स्वप्निल उनवणे यांची देखील चौकशी करून तात्काळ निलंबित करा?

## आरोपी पोलीस स्टेशनमध्ये उपस्थित असताना अटक न करण्यामागे काय दडले होते? पोलिसांचा भ्रष्ट कारभार उघड होणे गरजेचे?

बीड (प्रतिनिधी):– शिक्षण क्षेत्राला काळीमा फासणारा व लाज आणणारा भक्षक आणि लिंगपिसाट केजचे गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर याच्यावर अल्पवयीन १६ वर्षीय मुलीचा विनयभंग आणि पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल झाल्यानंतर संपूर्ण बीड जिल्हा हादरला आहे. केवळ बीडच नव्हे तर संपूर्ण मराठवाड्यात या घटनेबद्दल तीव्र संताप व्यक्त होत आहे.



सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ या निर्भीड वृत्तपत्राने सुरुवातीपासून या प्रकरणाचा पाठपुरावा केला. या लिंगपिसाट अधिकाऱ्याचे अनेक काळेकुट्ट कारनामे जनतेसमोर आणले. अखेर जनआक्रोश, तसेच महाराष्ट्र आरंभच्या दणक्याने प्रशासनाला लिंगपिसाट बेडसकरला निलंबित करण्याचा निर्णय घ्यावा लागला. मात्र हे निलंबन पुरेसं नाही, असे ठाम मत जिल्हाभरातून व्यक्त होत असून, लिंगपिसाट बेडसकरला फाशीची शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणी तीव्र झाली आहे. कारण लिंगपिसाट लक्ष्मण बेडसकरने गेल्या अनेक वर्षांपासून महिला



शिक्षि तरुणी, तसेच नोकरीच्या आमिषाला भुललेल्या मुलींना आपल्या जाळ्यात ओढून त्यांचे संसार उद्ध्वस्त केले. याबाबतचे अनेक आरोप असूनही प्रशासनाने कारवाई टाळली होती. मात्र या घटनेनंतर बेडसकरच्या सर्वच कारवायांचे पडसाद जनतेसमोर उमटले आहेत.

सर्वांत गंभीर बाब म्हणजे, गुन्हा दाखल करण्याच्या प्रक्रियेत आरोपी लक्ष्मण बेडसकर पोलीस ठाण्यात असतानाही त्याला अटक झाली नाही. उलट त्याला पसार होण्यास मदत केली गेली, अशी चर्चा जनतेत जोरात आहे. यातून केज पोलिस ठाण्याच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या संपूर्ण कारभारामागे केज पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे यांची भूमिका संशयास्पद असल्याचे समोर येत आहे. आरोपीला वाचवण्याचा प्रयत्न करण्यात आला का? अटक न करण्यामागे कोणते दडलेले स्वार्थ होते? या सर्व गोष्टींची कसून चौकशी व्हावी आणि पोलीस निरीक्षक उनवणे यांना तात्काळ निलंबित करावे, अशी जनतेतून मागणी जोर धरत आहे.

### शिक्षण क्षेत्राला काळीमा फासणारा नराधम बेडसकरने अनेक महिलांचे संसार उद्ध्वस्त केले?

**शिक्षण क्षेत्रातील भक्षक आणि लिंगदुष्ट गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर याने गेल्या अनेक वर्षांपासून महिला शिक्षिका, तरुणी आणि नोकरीच्या आमिषाला भुललेल्या मुलींना आपल्या जाळ्यात ओढून त्यांचे संसार उद्ध्वस्त केले, अशी गंभीर आरोप होत आहेत? प्रशासनाने आतापर्यंत कठोर कारवाई टाळली, ज्यामुळे या नराधमाच्या कारवायांवर जनतेत तीव्र संताप वाढला आहे. मात्र या घटनेनंतर बेडसकरच्या सर्वच कारवायांचे पडसाद लोकांपर्यंत पोहोचले आहेत आणि समाजात मोठा जनआक्रोश निर्माण झाला आहे. जनतेचा प्रश्न स्पष्ट मत आहे की, फक्त निलंबन पुरेसं नाही, कठोर कारवाई करून या भक्षकाला फाशीची दिली दिली जावी?**

### पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे यांच्यावर संशयाची सुई फिरली?

**सर्वांत गंभीर बाब म्हणजे पोलीस कारभाराचा शंकास्पद पैलू समोर आला आहे. सदर घटनेच्या पार्श्वभूमीवर, केज पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक स्वप्निल उनवणे यांची भूमिका संशयास्पद असल्याचे समोर आले आहे. आरोपीला अटक न करण्यामागे कोणते दडलेले स्वार्थ होते? त्याला वाचवण्याचा प्रयत्न पोलिसांनी केला का? या सर्व गोष्टींची कसून चौकशी होणे अत्यंत गरजेचे आहे, आरोपीवर कठोर कारवाई करून फासावर लटकवले पाहिजे आणि निरीक्षक स्वप्निल उनवणे यांना तात्काळ निलंबित करावे, अशी मागणी जनतेतून जोर धरत आहे. सखोल चौकशी न केल्यास जनतेचा विश्वास पोलिसांवर ढासळणार आहे असे मत व्यक्त केले जात आहे.**

# गायरान धारकांच्या नावे जमिनी करण्यासाठी राज्यभर लढा उभा करणार-पप्पू कागदे





## गायरान धारकांच्या न्याय हक्कासाठी आंदोलन

बीड (प्रतिनिधी):– राज्यासह जिल्हाभरात कसत असलेल्या गायरान जमिनीची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी व कसत असलेल्या गायरान जमिनी गायरान धारकांच्या नावे करण्यासाठी जिल्हा रिपाइंच्या वतीने आज दि.२३ सप्टेंबर २०२५ मंगळवार रोजी बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करुन भव्य रॅली काढून, जिल्हाधिकारी कार्यालयावर महाधरणे आंदोलनास सुरुवात करण्यात आली.

केंद्रिय मंत्री रामदास आठवले दलित पँथरच्या माध्यमातून कसत असलेल्या गायरान जमिनी गायरान धारकांच्या नावे करण्यासाठी राज्यभर गायरान धारकांचा लढा उभा केला. राज्याचे समाज कल्याण मंत्री असतांना १४ एप्रिल १९९० ला शासन परिपत्रक (शासन जी.आर.) लागू केला. त्यामुळे लाखो हेक्टर गायरान जमिनी गायरान धारकांच्या नावे करुन त्यांना उपजीविका भागविण्याचे साधन निर्माण करुन दिले.गायरान जमिनी नावे करण्यासाठी गायरान धारकांनी मुळ कागद पत्रांसह आपले प्रस्ताव वेळो-वेळी महसूल विभागाकडे सादर केलेली आहेत. परंतू शासनाच्या गळचेपी धोरणांमुळे गायरान जमिनी नावे होण्यासाठी विलंब होत आहे. अठरापगड जातीच्या समाज बांधवांच्या न्याय व हक्कासाठी काम करणारी चळवळ रिपब्लिकन पक्षाची आहे. आम्ही रिपाइंच्या माध्यमातून आजपर्यंत जिल्ह्यातील गायरान धारकांच्या नावे दोन हजार एकर जमीन करून सातबारा वाटप केले आहेत, व पाच हजार एकर गायरान जमिनीवर नविन अतिक्रमण करण्यात आले आहे. हे रिपाइंच्या आंदोलनाचे मोठे यश आहे. कसत असलेल्या गायरान जमीन व नवीन अतिक्रमणित जमिनी गायरान धारकांच्या नावे करण्यासाठी १९९० च्या शासन जीआर नुसार गायरान धारकांची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात यावीत. भूमिहीन गायरान धारक, शेतमजूर, ऊसतोड कामगार यांना प्रति महिना ३००० रुपये मानधन देण्यात यावे. गायरान धारकांच्या ७/१२ व ८-अ उतारा क्षेत्रावर असणारे पोट खराब क्षेत्र काढण्यात यावे.१९९० च्या शासन परिपत्रकास २०१५ पर्यंत मुद्दत वाढ देण्यात यावी. या प्रमुख मागण्यांची शासन दरबारी पूर्तता करण्यासाठी जिल्हा रिपाइंच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर महाधरणे आंदोलन करण्यात आले. आगामी काळातही गायरान धारकांना हक्काच्या जमिनी मिळवून देण्यासाठी रिपाइंच्या वतीने राज्यभर गायरान धारकांचा लढा उभा करणार आहे.

यावेळी राजू जोगदंड, मझर खान, किसन तांगडे, किशोर कांडेकर,सुशिलाताई मोराळे, अशोक साळवे

दिपक कांबळे, महादेव उजगरे, थोडीराम सिरसट, सचिन कागदे, हरिश मस्के मायाताई मिसळे, राणी गायकवाड, सलमा पठाण, शोभा गलांडे, दशरथ सोनवणे, सादेक पठाण,गोवर्धन वाघमारे, बापू पवार, शाहु डोळस, अरुण निकाळजे, लक्ष्मण सिरसट,

दशरथ शिदे, महेश आठवले, सादेक कुरेशी, विजय चांदणे, दिलिप बन्सोडे, रविंद्र जोगदंड, गौतम बचुटे, विलास वाघमारे, प्रमोद दासूद, दिपक कांबळे,

मिलींद तरकसे, सुरज काळे, निलेश ढोबळे, राहुल सरवदे, भगवान ससाणे, गणेश ढगे, विजय जाधव, अविनाश जोगदंड, प्रभाकर चांदणे, विलास जोगदंड, नागेश दुबळे,भैय्या मस्के, संभाजी गायकवाड, सुभाष तांगडे, सतिष सिनगारे, राजाभाऊ वक्ते, शाम वीर , अक्षय कोकाटे, धम्मा पारवेकर, नामदेव वाघमारे, देवानंद वाघमारे अशोक दळवी, भैय्यासाहेब साळवे, भाऊसाहेब दळवी, दिलीप खंदारे, सुभाष पारवे, रामदास मस्के, मनोज बोराडे, महेंद्र वडमारे, बाळासाहेब गव्हाणे, भाउसाहेब कांबळे, भास्कर जावळे, सोनू वडमारे, जितेंद्र खरात, मोहन वक्ते, यांच्यासह हजारो गायरान धारक, महीला, व रिपाइं कार्यकर्ते महाधरणे आंदोलनात सामील झाले होते.

**राज्यासह जिल्हाभरात कसत असलेल्या गायरान जमिनी गायरान धारकांच्या नावे करण्यासाठी रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष मंत्री रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली रिपाइंचे शिष्टमंडळ येत्या १५ दिवसात राज्याचे मुख्यमंत्री व महसूलमंत्री यांना भेटणार आहे.**

## संपादकीय...

# ...आपण इतके बधिर का झालो आहोत?

साहिबजादा फरहान नावाच्या पाक क्रिकेटपटूने रविवारी भारताविरुद्धच्या सामन्यात अर्धशतक साजरे करताना दुबईच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियममधील भारतीय प्रेक्षकांना खिजवले आणि हातातील बॅट स्टेनगनसारखी पकडून जे गोळीबाराचे हावभाव केले, ते तळपायाची आग मस्तकात नेणारे आहेत.

पाकपुरस्कृत दहशतवाद्यांनी काश्मीरमधील पहलगाम येथे २६ निरपराधांचे जीव घेतल्याच्या वेदना प्रत्येक भारतीयाच्या मनात कायम असताना दोन्ही देशांमध्ये हे सामने खेळले जात आहेत. किमान माणूस म्हणून तरी दोन्ही देशांच्या खेळाडूंनी एकमेकांच्या रक्तरंजित व्यथा, दु:ख समजून घेऊन अधिक जबाबदारीने वागण्याची, आपले बोलणे-चालणे किमान संवेदनशील ठेवण्याची गरज असताना हा मस्तीखोर क्रिकेटपटू पहलगामच्या निरपराध बळींची खिल्ली उडवतो.

हरिस रऊफ नावाचा आणखी एक खेळाडू सीमारेषेवर प्रेक्षकांना खिजवताना हाताने विमान पाडल्याचे हावभाव करतो, हे सारे अत्यंत संतापजनक आहे. याच रऊफला शुभमन गिलने सणसणीत चौकार मारला तेव्हा त्याने गिलला उद्देशून आक्षेपार्ह भाषा वापरली. ती ऐकल्यानंतर नॉन-स्ट्राइकच्या अभिषेक शर्माने त्याला जाब विचारला. मैदानावर अशी हमरातुमरी चालतच असते. पण, फरहान व रऊफचे हावभाव अजिबात सहन करण्यासारखे नाहीत. अंगावर सैनिकी गणवेश घालणारे जवान असोत, की खेळाडू, बहुतेक पाकिस्तानी लोकांच्या अंगातील मस्ती कमी होण्याची चिन्हे नाहीत. तशी शक्यताही नाही. त्याचे कारण स्पष्ट आहे, दहशतवादी व हिंसक मानसिकता हीच पाकिस्तानची ओळख आहे. दहशतवादी कृत्ये, निरपराधांचे बळी, रक्तपात हे सारे त्यातूनच येते आणि 'असे करणे म्हणजेच आपण पाकिस्तानी' असे हे लोक समजत असावेत.

याच आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत भारताचा कर्णधार सूर्यकुमार यादव याने नाणेफेकीवेळी हस्तांदोलन केले नाही म्हणून पाकिस्तानने कितीतरी फडफड केली. इंटरनॅशनल क्रिकेट कौन्सिलकडे निषेध नोंदविला. सामनाधिकारी ण्डी पायक्रॉफ्टविरुद्ध तक्रार केली. संयुक्त अरब अमिरातीविरुद्धच्या सामन्यावर बहिष्कार टाकला जाईल असे वातावरण तयार केले. तो सामना उशिरा सुरू केला. आयसीसीने दांडके उगारताच पाक क्रिकेट बोर्डाने नांगी टाकली. दुसऱ्या सामन्यातही पायक्रॉफ्ट हेच सामनाधिकारी म्हणून स्वीकारावे लागले. हस्तांदोलन न करणे हा सभ्य लोकांचा खेळ असलेल्या क्रिकेटच्या क्रीडांगणावरचा असभ्यपणा असेल तर स्टेनगनसारखी बॅट उलटी धरून गोळीबाराचे हावभाव करणे हा कोणता सभ्यपणा आहे, हा प्रश्न भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने पीसीबीला खडसावून विचारायला हवा. परंतु, भारतीय संघ व्यवस्थापनाने याबद्दल आंतरराष्ट्रीय क्रिकेट कौन्सिलकडे तक्रार केल्याची बातमी अजून तरी नाही. नियम म्हणून पाकविरुद्ध क्रिकेट सामना खेळावा लागणारच अशी भूमिका बीसीसीआयने घेतली आहे. भारत व पाकिस्तान संघ वेगवेगळ्या गटात टाकता आले नसते का या प्रश्नाचे उत्तर अद्याप मिळालेले नाही. याहून महत्त्वाचे हे की, खरा देशाभिमान, देशवासीयांच्या प्राणांचे मोल वगैरेंच्या आघाडीवर आपण भारतीय मुळातच कमालीचे लेचेपेचे, बोटचेपे, नेभळट आणि झालेच तर ढोंगी व भंपक आहोत. गेली जवळपास ऐंशी वर्षे हा शेजारी देश आपल्याला अतोनात त्रास देतो आहे. भारतात शांतता नांदूच नये यासाठी संधी मिळेल तेव्हा छुपे व उघड हल्ले करतो आहे. देशाच्या कानाकोपऱ्यात दहशतवादी घुसवतो आहे. रक्ताचे पाट वाहवतो आहे आणि आपण भारतवासी मात्र खेळाच्या सामन्यात सलग दुसऱ्यांदा पाकिस्तानला हरवले म्हणून चौकाचौकात जमा होऊन जल्लोष करतो आहोत. दहशतवादाविरोधातील युद्ध सोशल मीडियावर खेळतो आहोत. शाहीन शाह आफ्रिदीच्या पहिल्या बाउन्सरवर मारलेला षटकार नूरखान बेग तळावर पडला असे दाखविणारे फोटोशॉप करून टाळ्या वाजवतो आहोत. सामन्यानंतरच्या पत्रकार परिषदेत सूर्यकुमार यादवने केलेली काहीतरी टिप्पणी हे साहिबजादा फरहानच्या गुन्हेगारीसदृश कृतीला उत्तर असल्याचे सांगत फसवे समाधान करून घेतो आहोत. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे कळत-नकळत पहलगाममधील निष्पापांच्या बळींची तुलना क्रिकेटमधील बळींशी करून आपणही जणू देशविरोधी मानसिकतेचेच प्रदर्शन करीत आहोत. खरे देशप्रेम व त्यासाठी पडेल ती किंमत मोजण्याच्या तयारीचा विचार केला तर इतके तकलादू व दांभिक देशप्रेम जगात अन्यत्र अपवादानेदेखील सापडणार नाही. सारासार विचार करण्याची क्षमता, सद्सद्विवेक गमावून बसण्याइतपत आपला मेंदू, जाणिवा कशाने भणाणून गेल्या आहेत आणि आपण इतके बधिर का झालो आहोत? साहिबजादा फरहान नावाच्या पाक क्रिकेटपटूने रविवारी भारताविरुद्धच्या सामन्यात अर्धशतक साजरे करताना दुबईच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियममधील भारतीय प्रेक्षकांना खिजवले आणि हातातील बॅट स्टेनगनसारखी पकडून जे गोळीबाराचे हावभाव केले, ते तळपायाची आग मस्तकात नेणारे आहेत. पाकपुरस्कृत दहशतवाद्यांनी काश्मीरमधील पहलगाम येथे २६ निरपराधांचे जीव घेतल्याच्या वेदना प्रत्येक भारतीयाच्या मनात कायम असताना दोन्ही देशांमध्ये हे सामने खेळले जात आहेत.

# महापूराच्या विळख्यातून डी. आर. एफ. चे जवान आणि प्रशासनाने तत्परतेने लोकांचा जीव वाचवला

## आमदार विजयसिंह पंडित यांच्या अथक प्रयत्नांमुळे नागरिक सुखरूप





गेवराई (प्रतिनिधी) गेवराई विधानसभा मतदार संघातील अनेक गावांमध्ये मुसळधार पावसामुळे शेतकरी आणि नागरीकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. शिवछत्र परिवारातील सर्व सदस्य या संकट काळात खंबीरपणे उभे आहेत. मौजे खामगाव व नांदुर हवेली, ता. बीड येथे सिंदफणा नदीच्या पात्रात अडकलेल्या १६ नागरीकांची रात्री १२.१५ वाजता सुखरूप सुटका करता आली. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. श्री. अजितदादा पवार साहेब यांनी प्रशासनाला सक्त सूचना दिल्यामुळे हे शक्य झाले. एन. डी. आर. एफ. चे प्रमुख श्री. धर्मेंद्र यांच्या नेतृत्वाखाली २६ जवान त्यांच्या सर्व अत्याधुनिक साधन सामुग्रीसह पुरग्रस्त भागात दाखल झाले होते. त्यांनी केलेल्या अथक प्रयत्नांमुळे गाळ आणि पाण्यातून रात्री उशिरा नागरीकांना सुखरूप बाहेर काढले आहेत. महापूराच्या विळख्यात दिवसभर पाण्यात अडकलेले नागरीक रात्री उशिरा सुखरूप पाहोचले, यावेळी मी स्वत: त्याठिकाणी उपस्थित होतो. पाण्यात अडकलेल्या नागरीकांनी यावेळी उपस्थितांचे मनापासून आभार मानले. पूर परिस्थितीवर राज्याचे उपमुख्यमंत्री ना. श्री. अजितदादा पवार साहेब यांचे संपुर्ण लक्ष आहे. नागरीकांची सुखरूप सुटका झाल्याचा वृत्तांत त्यांना रात्री उशिरा कळविला. गेवराई विधानसभा मतदार संघात अतिवृष्टी आणि पूर परिस्थितीमुळे सिंदफणा आणि गोदावरी नदी काठावरील जनजीवन संपुर्ण विस्कळीत झाले आहे. अशा परिस्थितीत राज्याचे उमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. श्री. अजितदादा पवार साहेब, एन. डी. आर. एफ. चे जवान आणि प्रशासनाने तत्परतेने केलेली मदत मोलाची ठरली आहे.

पान ४ वरून..

**कोठारबनचे ग्रामस्थ नदीवरील पुलाच्या प्रश्नासाठी आक्रमक**

ऐकून घ्यायला तयार नव्हते तर तहसीलदार यांनी थेट नदीपात्राच्या वाहत्या पाण्यात उतरून आंदोलनकर्त्यांशी सकारात्मक चर्चा करून अवघ्या तीन महिन्यात या पुलाला मंजुरी मिळवण्यासाठी वरिष्ठ पातळीवरील प्रशासनाला सांगून मंजुरी देऊ असे लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलनकर्त्यांनी तहसीलदार यांना निवेदन दिले. या आंदोलना दरम्यान अनेक घोषणाबाजी करण्यात आली होती. आंदोलनात अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलिसांचा फौजफाटा तैनात होता. या आंदोलनाला भाजपा युवा मोर्चाचे बीड जिल्हा अध्यक्ष संजय आंधळे, वंचितचे प्रकाश उजगरे यासह अन्य मान्यवरांनी भेटी दिल्या आहेत.

आंदोलनात सर्व ग्रामस्थांचा सहभाग *

सदरील प्रश्न हा आंबेडकर वस्तीचाच नव्हता तर नदीपल्याड शासनाने आरोग्य विभागाची कोट्यावधी रुपयाची बिल्डिंग बांधली आहे त्या ठिकाणी जायचे म्हटले तर याच नदीपात्रातून ये जा करावी लागते तसेच या नदीच्या पलीकडे गावातील शेतकऱ्यांच्या शेती देखील आहेत हा प्रश्न फक्त आंबेडकर वस्तीचा नसून संपूर्ण गावाचा असल्याने आंबेडकर वस्तीतील लोकांनी पुकारलेल्या आंदोलनात सर्व ग्रामस्थांनी सहभाग नोंदवून शासन प्रशासनाचा निषेध करत आंदोलनात सहभाग नोंदविला आहे.

---

**जनतेचा पैसा जनतेसाठी की सरकारी बाबूंना**

मागणी करत अनेक वेळा रस्त्याच्या मागणीसाठी निदर्शने,आंदोलनेही करण्यात आली.तरी बीड नगरपरिषदेच्या कार्यालयाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बशीरगंज राजुरी वेस दरम्यान रस्ता आमच्या कार्यालय अंतर्गत येत नाही,असा लेखी पत्र देण्यात आला. या पत्राचे अवलोकन करत जिल्हा परिषद कार्यालय, सार्वजनिक बांधकाम कार्यालय व राष्ट्रीय महामार्ग कार्यालय यांना दिलेल्या निवेदनाचा पाठपुरावा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे बीड शहराध्यक्ष अमरजान पठाण यांनी केला असता,जिल्हा परिषद कार्यालय,सार्वजनिक बांधकाम व राष्ट्रीय महामार्ग कार्यालय इत्यादींच्या वतीने लेखी पत्र देण्यात आले आहे की,छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बशीरगंज राजुरी वेस दरम्यान रस्ता हा त्यांच्या कार्यालयांतर्गत येत नाही अथवा या कार्यालयांच्या दप्तरात रस्त्याची नोंद नाही. जर कुठल्याही शासकीय कार्यालयाच्या दप्तरी रस्त्याची नोंद नसेल,तर छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जिल्हा परिषद कार्यालयाच्या गेटपर्यंत होत असलेल्या रस्त्याचे काम कोण करतोय? आजपर्यंत जो रस्ता झाला त्याचा निधी कोणी उचलला? रस्ता मंजूर नसतानाही कंत्राटदार कुणाच्या सांगण्यावरून किंवा कोणत्या अधिकाऱ्यांच्या दबावावरून रस्त्याचे काम करत आहे? रस्ता करण्यासाठी जो खर्च होतो तो खर्च भ्रष्टाचार करून जनतेच्या खिशातूनच भरणार आहे का? छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जिल्हा परिषद कार्यालयाच्या गेटपर्यंत होत असलेले रस्त्याचे काम हे सरकारी बाबूंना सुविधा पोहोचवण्यासाठीच, म्हणजेच त्यांची गाडी गेटपर्यंत पोहोचण्यासाठी होत आहे का? असा प्रश्न महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे बीड शहराध्यक्ष अमरजान पठाण यांनी जिल्हा प्रशासनासमोर मांडला आहे. या प्रश्नांचे उत्तर जिल्हाधिकारी आणि पालकमंत्र्यांनी जनतेला द्यावे.जर छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बशीरगंज राजुरी वेस,कारंजा रोड, बलभीम चौक,जुना बाजार ते कोतवाल वेस पर्यंत रस्त्याचे काम लवकरच सुरू झाले नाही,तर मनसे स्टाइलने छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बशीरगंज चौक दरम्यान रस्त्यावर भाजीमंडी भरून आंदोलन करण्यात येईल,असे प्रसिद्धी माध्यमांना दिलेल्या पत्रकात नमूद केले आहे.

जनतेच्या पैशाचा वापर सरकारी बाबूंना सुविधा पोहोचवण्यासाठी होत आहे.आम्ही जर जनतेच्या हितासाठी मागणी केली, तर सरकारी अधिकारी आम्हाला पत्र देतात की छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बशीरगंज राजुरी वेस दरम्यान रस्ता हा आमच्या कार्यालयांतर्गत येत नाही.आणि तेच अधिकारी सरकारी बाबूंना सुविधा पोहोचवण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज चौक ते फक्त जिल्हा परिषद कार्यालय गेटपर्यंत रस्त्याचे काम करतात.

लवकरच जर छत्रपती शिवाजी महाराज चौक ते राजुरी वेस, कारंजा रोड,बलभीम चौक,जुना बाजार ते कोतवाल वेस पर्यंत रस्त्याचे काम सुरू झाले नाही,तर आम्ही मनसे स्टाइलने शिवाजी महाराज चौक ते बशीरगंज चौक दरम्यान रस्त्यावर भाजीमंडी भरवू,अशी प्रतिक्रिया महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे बीड शहराध्यक्ष अमरजान पठाण यांनी प्रसिद्धी माध्यमांशी बोलताना दिली.

---

**पूरग्रस्तांच्या मदतीसाठी आ. विजयसिंह पंडित धावले**

पाण्याच्या पाण्यामुळे गोदावरी नदीपात्रात पूर्व परिस्थिती निर्माण झाली आहे राक्षस गोदावरी नदी काठावरील अनेक गावांना याचा तडाका बसला आहे त्याचबरोबर गेवराई तालुक्यातून जाणाऱ्या सिंदफणा नदीमध्येही आज अचानक वाढलेल्या पाण्यामुळे पूरस्थिती गंभीर बनली. पूरग्रस्त भागाचा माजी आमदार अमरसिंह पंडित आणि विद्यमान आमदार विजयसिंह पंडित यांनी दौरा केला. आ. विजयसिंह पंडित यांनी बीड तालुक्यातील खामगाव आणि नांदूर हवेली या ठिकाणी दुपारी भेट दिली. चार तास थांबून प्रशासनाच्या मदतीने पुरात अडकलेल्या लोकांच्या सुटकेसाठी शर्थीचे प्रयत्न केले. शेतकरी आणि नागरिकांनी घाबरून जाऊ नये. प्रशासकीय मदत मिळवून देण्यासाठी आणि झालेल्या नुकसान भरपाईसाठी आपण प्रयत्न करू असे सांगून लोकांना धीर न सोडण्याचे आवाहन त्यांनी केले. आ. विजयसिंह पंडित यांच्या उपस्थितीत रात्री उशिरा प्रशासन आणि एनडीआएफच्या मदतीने पुरात अडकलेल्या नागरिकांची सुटका केली.

यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन तहसीलदार चंद्रकांत शेळके, सरपंच शाहेद पटेल यांच्यासह महसूल मंडळाचे अधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

**किल्लेधारूर घाटातील भीषण अपघातात एक ठार, एक गंभीर जखमी**

क्रमांक एम एच १२ जीटी १०६८ यांची समोरासमोर धडक होऊन मुंजाभाऊ धर्मराज सोळंके वय ६०वर्ष जागीच ठार झाले तर रमेश जनार्धन मोरे वय ६५ वर्ष रा. मुंगी हे गंभिर जखमी झाले आहेत.त्यांना अंबेजोगाई रूग्णालयात हलवण्यात आले आहे.

धारूर घाट हा अतिशय अरुंद आणि अवघड वळणांचा घाट म्हणून परिचित आहे. घाटातील वळणं तीव्र असल्याने वाहनचालकांना अनेकदा अडचणींचा सामना करावा लागतो. गेल्या काही वर्षांपासून या घाटात वारंवार अपघात घडत असून अनेक प्रवासी बळी पडले आहेत. तरीदेखील अद्याप प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी घाटाच्या सुधारणा कामाकडे पुरेसे लक्ष दिलेले नाही, अशी नागरिकांची तक्रार आहे.

दरवर्षी पालखी सोहळ्यातून हजारो वारकरी या मार्गाने प्रवास करतात. अशा वेळी रस्त्याची अरुंद रचना आणि सुरक्षिततेचा अभाव यामुळे अपघाताचा धोका अधिक वाढतो. स्थानिक ग्रामस्थ आणि प्रवासी यांची मागणी आहे की, शासनाने तात्काळ घाटाचे रुंदीकरण करून प्रवास सुरक्षित करावा. नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने धारूर घाट रुंद करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी आता जोर धरत आहे. अन्यथा मोठ्या प्रमाणावर अपघात होऊन जीवितहानी टाळता येणार नाही, असा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

---

**परळी तालुक्यातील गावांना**

नुस्कानीचे आढावा घेण्यात आला. २२ सप्टेंबर रोजी झालेल्या ढग फुटी मुळे परळी तालुक्यातील गावांना शेतकऱ्यांना पिकांचे मोठे मुस्कान झाले आहे. यामध्ये कवडगाव कवडगाव घोडा आचार्य टाकळी सिरसाळा तपोवन पिंपरी कासरवाडी पोहनेर या गावांमध्ये गोदावरी नदीचे पाणी शिरले आहे तरी सिरसाळा पोलीस स्टेशनचे एपीआय गोरखनाथ दहिफळे साहेब व त्यांची पूर्ण टीम घटनास्थळी दाखल झाली आहे व सुखरूप माणसांना व जनावरांना बाहेर काढण्यात आले आहे. अनेक ठिकाणी जमीन खरडून गेल्याने शेतकऱ्याच्या डोळ्यासमोर आताशी आलेले पीक वाहून गेले. बोला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांच्या सरसकट नुकसान भरपाई मिळावी अशी ठाम मागणी यावेळी करण्यात आली.

================

---

**बीड जिल्ह्यात डॉक्टरांकडून गोरगरिबांची लूट**

दर लागू करणं गरजेचं आहे. परंतु सध्याची परिस्थिती पाहता, सामान्य माणसाला खाजगी रुग्णालयांचा खर्च परवडणारा राहिलेला नाही.

शेख एहतेशामुद्दीन यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, आरोग्यमंत्री डॉ. तनाजी सावंत आणि बीड जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्याकडे मागणी केली आहे की, अशा प्रकारे रुग्णांची लूट करणाऱ्या डॉक्टरांवर कठोर कारवाई करण्यात यावी. गरज भासल्यास संबंधित डॉक्टरांचा परवाना रद्द करण्याची शिफारस देखील त्यांनी केली आहे. डॉक्टर हे देवाचे दुसरे रूप मानले जाते, पण आजच्या व्यापारीकरणाच्या युगात काही डॉक्टरांनी हा दर्जा गमावला आहे, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली. बीड जिल्ह्यातील आरोग्य सेवांमध्ये पारदर्शकता आणि जबाबदारी यासाठी प्रशासनाने लवकरात लवकर ठोस पावले उचलावीत, अशी मागणी स्थानिक जनतेकडूनही होऊ लागली आहे.

---

**अल्पवयीन मुलीवर लैंगिक**

पूर्वनियोजित आहे, जर हे पूर्वनियोजित होते तर तो कसा काय अडकला जर एखादी महिला असतील तर गोष्ट वेगळी होती पण ती एक लहान अल्पवयीन मुलगी आहे अनेक वेळा त्यांनी असा घाणेरडा प्रकार केला असावा म्हणून तो अडकला एखाद्या अधिकाऱ्यांनी स्वतःची अशी किळस वाणी मलिन प्रतिमा ठेवली तर समाजातील लोकांनी किंवा शिक्षकांनी कोणाचा आदर्श घ्यावे आणि शिक्षण घेणाऱ्या मुलींनी स्वतःला सुरक्षित कसे ठेवावे आज या बालिकेने परवा न करता एवढे मोठे धाडस केले पण न जाणो अशा कित्येक अल्पवयीन आजही घरात अंधारात आहेत कित्येक पालक अब्रू राखण्यासाठी सर्व माहीत असूनही शांत आहेत गेल्या काही दिवसापूर्वीचे अल्पवयीन मुलीच्या छेडखानीचे प्रकरण ताजे असूनही ही घटना जिल्ह्यात घडते म्हणजे अत्यंत लाजिरवाणी गोष्ट आहे. आणि या सर्व बाबीची सखोल चौकशी होऊन नराधम आरोपीला तात्काळ बेड्या ठोकाव्यात व अटक करावी अन्यथा लोकशाही मार्गाने पोलीस प्रशासन व शिक्षण विभागाच्या विरोधामध्ये आता सातत्याने अनेक सामाजिक संघटना आंदोलनच्या पवित्र मध्ये आहेत असा इशारा या सामाजिक कार्यकर्ते आम्रपाली ताई साबळे गायकवाड यांनी दिला आहे .

---

**समाजसेवकांचे धाडस;मृत्यूच्या दारातून**

जीव वाचवण्यासाठी तडफडत होता. त्या क्षणी कुणीही पुढे सरसावणे म्हणजे स्वतःच्या जीवाशी खेळणे होते. पण मुसाखान, जावेद भाई, अयान व सोबतचे काही तरुण देवदूतासारखे त्या पुलावरून खाली उतरले. स्वतःचा जीव धोक्यात घालून त्यांनी त्या निरपराध लहान मुलाला हातात धरून पाण्याबाहेर काढले. क्षणभर जरी उशीर झाला असता तर कदाचित तो लहान जीव आज आपल्यात नसता.

हा प्रसंग पाहणाऱ्यांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. त्या वीर युवकांनी दाखवलेले धाडस म्हणजे मानवतेचे खरे उदाहरण आहे. समाजसेवक होणे म्हणजे फक्त भाषणबाजी नाही, तर संकटसमयी लोकांसाठी खंबीरपणे उभे राहणे हेच त्याचे खरे मोल आहे.आज मुसाखान, जावेद भाई, अयान व त्यांच्या सोबतींच्या या पराक्रमामुळे एक आईचे कुशीतले लेकरू वाचले. मृत्यूच्या दारातून परत आलेल्या त्या मुलाच्या चेहऱ्यावर उमटलेले स्मित म्हणजे त्यांच्यासाठी सर्वात मोठे पारितोषिक ठरले.देव माणसाच्या रूपात कधी आणि कुठे प्रकट होईल हे सांगता येत नाही. आज मात्र बीड शहराने देवदूतांचा अवतार आपल्या डोळ्यांनी पाहिला म्हणलं तर तो चुकीचा ठरणार नाही हे मात्र नक्कीच..!

---

**अमृता नदीला पूर; धोंडराई गावात पुराचे पाणी, पावन हनुमान**

अनेक भागात पूरस्थिती निर्माण झाली आहे. यामुळे धोंडराई येथील पावन हनुमान परिसरात अमृता नदीला मोठा पूर आला आहे. नदीला आलेल्या पुराचे पाणी गावात देखील शिरले असून गावातील पावन हनुमान मंदिर देखील पाण्याखाली गेले आहे. तसेच गावाला सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

पावसाचा धुमाकूळ पाहायला मिळत आहे. जोरदार पावसामुळे नदी नाल्यांसह तलाव भरगच्च भरले आहेत. नदी नाल्यांना आलेल्या पुरामुळे शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. गेवराई तालुक्यातील धोंडराई येथील पावन हनुमान मंदिर पाण्याखाली गेले असून येथील गावकऱ्यांना जिल्हा प्रशासनाने सतर्क राहण्याचा इशारा दिला आहे. नदीला पूर आल्याने कुठल्याही क्षणी गावांमध्ये पाणी घुसू शकते, अशी स्थिती निर्माण झाली आहे. बीडच्या गेवराई तालुक्यातील धोंडराई येथे झाले असून अमृता नदीला आलेल्या पुरामुळे पुराचे पाणी गावामध्ये शिरले असून गावांमधील शेती शिवारात पाणीच पाणी झाल्याने शेतकरी हतबल झाला आहे दुसरीकडे पावन हनुमान मंदिर पाण्याखाली गेले आहे.याचा येथील शेती पिकांना व शेतकऱ्यांनी केलेल्या कबाड कष्टाला मोठा फटका बसला आहे.

---

**अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त**

होत आहे. सोयाबीन,तूर, आदी पिकाचे नुकसान झाले असून शेतकऱ्यांच्या हात तोंडाशी आलेला घास निसर्गाच्या कोपा मुळे मातीमोल होत असल्याने बळीराजावर आर्थिक संकट कोसळले त्यांना शासनाने तत्काळ नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी जिल्हाधिकारी बीड यांना तलवाडा गटाचे जिल्हा परिषद सदस्य ड सुरेश हात्ते यांनी सोमवार रोजी निवेदनाद्वारे केली आहे.

---

**-गेवराई नगरपरिषदेचा गलथान**

पाण्यामुळे अपघात होऊ शकतो याचा विचार गेवराई नगरपरिषदेच्या स्वच्छता विभागाने करावा त्यामुळे गेवराई शहरातील सर्व नाल्यांची तात्काळ सफाई करून नाल्यांची सफाई करावी . नगरपरिषदेचे सिओ विक्रम मांडुरके साहेब आपण एकदा शहरातील रस्त्यांवर आल्यावरच त्यांना पावसाच्या पाण्यामुळे शहरातील साचलेल्या पाण्याची अवस्था कळेल तसेच विद्रूपा नदीपात्र परीसरात फेरफटका मारल्यास परीसरातील तुंबलेल्या नाल्या , साचलेल्या कचरा व कोंडलेल्या नाल्या दिसतील पुढील अनर्थ टाळण्यासाठी नगरपरिषदेच्या स्वच्छता विभागाने तत्परतेने गेवराई शहरातील नाल्यांची सफाई करून घ्यावी अशी मागणी गेवराई शहरातील जनतेतून होत आहे .

# घटस्थापनेने योगेश्वरी देवीच्या नवरात्र महोत्सवास प्रारंभ

अंबाजोगाई (प्रतिनिधी):– महाराष्ट्राचे शक्तीपीठ व लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या अंबाजोगाईच्या योगेश्वरी देवीच्या नवरात्र महोत्सवास सोमवारी व सकाळी दहा वाजता घटस्थापना व महापूजेने प्रारंभ झाला. अप्पर जिल्हाधिकारी सौ. अश्विनी जिरगे(सोनवणे), श्री.हरिश्चंद्र सोनवणे यांनी श्री योगेश्वरी देवीची विधीवत महापुजा केली. महापूजेनंतर योगेश्वरी देवीच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. २२ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर या कालावधीत श्री योगेश्वरी देवीचा नवरात्र महोत्सव साजरा होत आहे. सोमवारी सकाळी मंदिरात घटस्थापना व महापुजेने महोत्सवास प्रारंभ झाला.अप्पर जिल्हाधिकारी सौ. अश्विनी जिरगे(सोनवणे) हरिश्चंद्र सोनवणे यांनी योगेश्वरी देवीची विधीवत महापुजा केली. या महापुजेसाठी योगेश्वरी देवल कमिटीचे अध्यक्ष तथा तहसीलदार विलास तरंगे, उपाध्यक्ष अक्षय मुंदडा,सचिव गिरधारीलाल भराडीया, सहसचिव कमलाकर चौसाळकर,कोषाध्यक्ष सौ.पूजा राम कुलकर्णी, उत्सव प्रमुख उल्हास पांडे, विश्वस्त आ.नमिता मुंदडा,राजकिशोर मोदी, पृथ्वीराज साठे,भगवानराव शिंदे,ड.शरद लोमटे,श्रीराम देशपांडे ,विश्वस्त तथा मुख्य पुजारी सारंग पुजारी,सौ.गौरी जोशी, संजय भोसले, हंसराज देशमुख,शिरीष पांडे, प्रवीण दामा,राजन पुजारी यांच्यासह पुरोहित, मानकरी पत्रकार,भाविक उपस्थित होते. यावेळी पुरोहितांच्या मंत्रोपच्चारात व विधीवत महापूजेनंतर महाआरती झाली. घटस्थापनेनंतर योगेश्वरी देवीच्या दर्शनासाठी महिला व भाविकांची मोठी गर्दी झाली होती. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी देवल कमिटीच्या



वतीने सर्व सेवा व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

विविध उपक्रमांची रेलचेल

योगेश्वरी देवीच्या नवरात्र महोत्सवाच्या निमित्ताने रविवारपासून मंदिर परिसरात कीर्तन, प्रवचन, भजन आदी उपक्रम सुरू झाले आहेत. या सर्व उपक्रमांना भाविकांची मोठी गर्दी होऊ लागली आहे.

ढोक महाराजांची रामकथा

योगेश्वरी देवीच्या नवरात्र महोत्सवाच्या निमित्ताने २४ नोव्हेंबर

बुधवार पासून ते २९ नोव्हेंबर

सोमवार पर्यंत सायंकाळी ७ ते रात्री १० या वेळेत रामायणाचार्य रामराव ढोक महाराज हे रामकथा सांगणार आहेत. या रामकथेचा लाभ सर्व भाविकांनी घ्यावा असे आवाहन देवल समितीचे अध्यक्ष तथा तहसीलदार विलास तरंगे,सचिव गिरधारीलाल भराडिया, उपाध्यक्ष अक्षय मुंदडा, उत्सव प्रमुख उल्हास पांडे, श्रीराम देशपांडे पूजा कुलकर्णी यांच्यासह सर्व विश्वस्तांनी केले आहे.

# बीडमधील ऊसतोड कामगारांवरील 'कूस' लघुपटाला राज्यस्तरीय तिसरे पारितोषिक

बीड (प्रतिनिधी);– ऊसतोड मजूर महिलांचे आरोग्य व त्यांचे जगणे मांडणाऱ्या 'कूस' या लघुपटाला राज्यस्तरीय उत्कृष्ट लघुपट म्हणून तिसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे. या लघुपटाची निर्मिती उचित मीडिया सर्व्हिसेसने केली असून, दिग्दर्शन व लेखन डॉ. ज्ञानेश्वर जाधवर यांनी केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या (अजित पवार) चित्रपट व सांस्कृतिक विभागातर्फे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त 'अजितपर्व' या लघुपट महोत्सवाचे आयोजन केले होते. या स्पर्धेत आगीनफूल लघुपटास प्रथम, तर चंद्रलेखा लघुपटास द्वितीय पारितोषिक मिळाले. या स्पर्धेत राज्यभरातून ३५० पेक्षा अधिक लघुपटांनी सहभाग घेतला होता. त्यातून कूस लघुपटाने तिसरा क्रमांक मिळवला.



राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ व प्रसिद्ध अभिनेते मकरंद अनासपुरे यांच्या हस्ते 'कूस' लघुपटाच्या टीमला सन्मानित करण्यात आले. पुण्यातील पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक केंद्रात आयोजित कार्यक्रमावेळी ज्येष्ठ अभिनेते अरुण नलावडे, चित्रपट महामंडळाचे मेघराज राजेभोसले, अभिनेत्री देविका दफ्तरदार, अभिनेते मिलिंद दास्ताने, सुनील गोडबोले, प्रभाकर मोरे, असित रेडीज, राष्ट्रवादीच्या नेत्या वैशाली नागवडे, रुपाली ठोंबरे, बाबा धुमाळ, संयोजक बाबासाहेब पाटील, नितीन धवणे पाटील, आदित्य संजयराव, अपेक्षा चव्हाण आदी उपस्थित होते. संदीप पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

निर्माता जीवराज चोले व दिग्दर्शक डॉ. ज्ञानेश्वर जाधवर यांनी हे पारितोषिक स्वीकारले. ५५,५५५/– रुपये, मानचिन्ह व सन्मानपत्र असे या पारितोषिकाचे स्वरूप आहे. अभिनेता विठ्ठल काळे यांना उत्कृष्ट अभिनेता हा पुरस्कार मिळाला. यावेळी कार्यकारी निर्माती तेजस्विनी थिटे, अभिनेता अनिल कांबळे, अभिनेत्री डॉ. सोनाली घाटणेकर, वेशभूषाकार भाग्यश्री राऊत, केशभूषाकार प्राजक्ता लोंढे, सहायक कलादिग्दर्शक लखन चौधरी आदी उपस्थित होते.

'कूस' कादंबरीवर आधारित लघुपट

बीड जिल्ह्यातील ऊसतोड मजूर महिलांचे जगणे, त्यांच्या मासिक पाळीचा व आरोग्याचा प्रश्न, गर्भाशय पिशवी काढण्याचे प्रकार आणि त्यातून होणारी त्या स्त्रीची, कुटुंबाची कुचंबणा आदी गोष्टी या लघुपटातून मांडण्यात आल्या आहेत. डॉ. ज्ञानेश्वर जाधवर यांच्याच अनेक पुरस्कारप्राप्त 'कूस' या कादंबरीवर आधारित हा लघुपट असून, निर्माता व लेखक–दिग्दर्शक ऊसतोड मजूर कुटुंबातून आल्याने अतिशय वास्तविक रूपात तो मांडला गेला आहे. विठ्ठल काळे यांच्यासह अनुया कळसकर, वैशाली केंजळे, डॉ. सोनाली घाटणेकर, अनिल कांबळे व जीवराज चोले यांच्या यामध्ये प्रमुख भूमिका आहेत.

## नवीन बस स्थानकातील पोलीस चौकीचे काम तात्काळ पूर्ण करावे – रविंद्र शिनगारे.

बीड (प्रतिनिधी):– बीड शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी होत असलेल्या नवीन बस स्थानकात नागरिकांच्या, प्रवाशांच्या सुरक्षेसाठी २४ तास सेवा देणाऱ्या पोलीस विभाग विभागाकडून दिली जाते. परंतु पोलीस कर्मचाऱ्यात २४ तास कर्तव्यावर हजर राहावे लागते. पोलिसांमुळे प्रवाशांना देखील रात्री अप रात्री ऐनवेळी सुरक्षित वाटते. कारण त्यांना माहिती असते काही कमी जास्त झाले तर पोलीस चौकी आहे. म्हणूनच प्रवाशांच्या सुरक्षतेबरोबरच, पोलीस कर्मचाऱ्यांची सुरक्षा देखील महत्त्वाची आहे आणि पोलीस कर्मचाऱ्यांची सुरक्षा म्हणजे ऊन वारा पाऊस रात्र अपरात्र कर्तव्य बजावत असताना यापासून थोडासा बचाव होण्यासाठी. किंवा ऐनवेळी एखाद्या प्रवाशासोबत एखादी घटना घडली तर ते तात्काळ पोलीस चौकीवर असणाऱ्या कर्मचाऱ्यांची मदत घेतील. त्या कारणाने तात्काळ पोलीस चौकी चे काम पूर्ण करून द्यावे. अशी मागणी पोलीस बॉईज असोसिएशन महाराष्ट्र राज्य अध्यक्ष रविंद्र शिनगारे यांनी जाहीर प्रसिद्धी पत्रकारद्वारे केली आहे.





**परळी :पोलीस ठाणे परळी शहर येथे नवीन गाडी बोलोरो मा. पोलीस अधीक्षक साहेब बीड यांनी परळी शहर पोलीस ठाणे येथे नवीन गाडी दिली आहे. पूजा करताना श्री रघुनाथ नाचन साहेब पोलीस निरीक्षक परळी शहर.**



**बीड :– राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने नियोजन करून दिलेल्या नवरात्र उत्सवात सन्मान नवदुर्गाचा नऊ दिवसीय कार्यक्रम निमित्त पहिला दिवस आयोजक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महिला जिल्हा सचिव अनुराधा प्रकाश यांनी पोस्ट ऑफिस बीड येथील काही महिलाना सन्मान पत्र देवून सन्मानित केले त्या प्रसंगी उपस्थित राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महिला जिल्हअध्यक्ष प्रज्ञा ताई खोसरे , कार्याध्यक्ष शालिनी ताई परदेशी, नंदिनी ताई, कोमल ताई या सर्व महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.**

# अतिवृष्टीने बळीराज्या हवालदील मौजे पिंपळा अंतर्गत पंचनामे करा–रोहिदास सोनवणे



पिंपळा (प्रतिनिधी):– आष्टी तालुक्यातील मौजे पिंपळा महसूल सर्कल अंतर्गत लोणी,कोयाळ, ठोंबळसांगवी तसेच वाड्या वस्त्या या सर्व ठिकाणी अतिवृष्टी सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे.तुर,सोयाबीन व कांदा तसेच अन्य सर्व पिकांची मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे शासनाने याची योग्य ती दखल घेऊन सरसकट पंचनामे करावेत.योग्य नुकसान भरपाई बळीराजाला द्यावी.तसेच पिंपळा अंतर्गत सुंबेवाडी,धनगरवाडी व काकडेवाडी या क्षेत्रामध्ये ई–पिक पाहणी लोकेशन दुरुस्त करण्यात यावे.जुने व नवे सर्वे नंबर व गट नंबर बदलल्यामुळे ई–पीक पाहणी करताना आहे त्या क्षेत्रापासून दोन–तीन किलोमीटर दूरवर लोकेशन दाखवत आहे.त्यामुळे क्षेत्र लोकेशन दुरुस्तीच निवेदन दोन महिन्यापूर्वीच माननीय तहसीलदार साहेब आष्टी यांना देण्यात आले होते.परंतु त्यावर कोणतीहि कार्यवाही झाली नाही.स्मरणपत्र म्हणून आज पुन्हा ग्रामस्थांच्या वतीने माननीय तहसीलदार साहेब यांना लोकेशन दुरुस्ती संदर्भात निवेदन देण्यात आले आहे.तरी त्यावरती योग्य ती कार्यवाही करून हा प्रश्न कायमचा सोडवावा ही विनंती करण्यात येत आहे.अशी मागणी ग्रामस्थ.रोहिदास सोनवणे. चंद्रशेखर साके.युवराज खटके.महेश काकडे.संपत शेंडगे.अमर भवर.सत्यवान धायगुडे.सचिन सुंबे.मच्छिंद्र फणसे.सचिन भस्मे.अनिल खुरांगे.संदीप लिंबोरे.विलास खटके यांनी केली आहे.

## रमेश गावडे पुरग्रस्ताच्या मदतीला धावले; स्वखर्चातून धान्य, किराणा किटसह रोख स्वरूपात मदत!

दौलावडगाव:अतिवृष्टीने क्षणात होत्याचं नव्हत झाल आणि अनेक ठिकाणच्या शेतकर्याचे अतोनात नुकसान होऊन प्रपंच उघड्यावर आल्याने अडचणीत सापडलेल्या नागरिकांच्या मदतीसाठी लोकनेते आ.सुरेश आण्णा धस याच्या माध्यमातून भाजपा मंडळ अध्यक्ष रमेश गावडे यांनी धान्य, किराणा किटसह रोख स्वरूपात मदतीला धावल्याने कौतुक होत आहे.



आष्टी भाजप मंडळ अध्यक्ष असलेले देवीनिमगाव येथील रमेश गावडे यांनी आ.सुरेश आण्णा धस याच्या माध्यमातून तालुक्यात झालेल्या पावसाने नदीसह नाले,ओढ्याला महापुर आल्याने अनेक शेतकऱ्यांचे शेतीसह,अन्नधान्य, संसार उपयोगी वस्तूचे नुकसान होऊन घरात पाणी शिरल्याने प्रपंच वाहून गेल्याने कुटुंब उघड्यावर आले होते.पण या कुटुंबांना माणुसकीचा आधार देत रमेश गावडे यांनी देवीनिमगाव, दादेगांव, डोंगरगण येथील पूरग्रस्त कुटुंबाला स्वखर्चातून धान्य, किराणा किटसह रोख स्वरूपात फुल ना फुलाची पाकळी मदत दिली आहे.आ.सुरेश आण्णा धस याच्या माध्यमातून ही मदत सुरूच राहणार असून पूरग्रस्तांच्या पाठीशी आम्ही सदैव उभा असल्याचे रमेश गावडे यांनी सांगितले.

# सिंधफणा नदीने धोक्याची पातळी ओलांडली

गेवराई (प्रतिनिधी):– शंभर वर्षांत पहिल्यांदाच सिंदफणा नदीने धोक्याची पातळी ओलांडली असून, गोदावरी नदीच्या पात्रात जवळपास एक लाखाहून आधिक पाणी विसर्ग होत असल्याने गेवराई तालुक्यातील दोन्ही नद्यांच्या काठावरील नागरिकांनी सतर्क राहावे असे आवाहन लोकप्रतिनिधी तसे महसूल प्रशासनाकडून करण्यात आले आहे. बीड जिल्ह्यात मागील आठवड्यापासून पाऊस पडत आहे.रविवारी अन् सोमवारी पावसाने कहरच केला.सिंदफणेत पाणी बसले नसल्याने नदीचा प्रवाह बदलला यामुळे गेवराई व बीड तालुक्यातील नदीकाठावरील गावांना पुराचा विळखा पडला होता.

इंदूर हवेलीत तर ३२ नागरिक पुरात अडकल्याने प्रशासन सोमवारी रात्री शर्थीचे प्रयत्न करत या नागरिकांना सुखरूप बाहेर



काढले.गोदावरी काठावरील भोजगाव, राजापूर आणि काठोडा या गावाला देखील पूराचा तडाखा बसला आहे.एवढे नाहितर गेवराई तालुक्यातील ग्रामीण भागात पाणीच पाणी झाल्याने जनजीवन विस्कळीत झाले होते.

सिंदफणा नदीने पहिल्यांदाच ओलांडली धोक्याची पातळी

बीड जिल्ह्यात झालेल्या दोन दिवसाच्या पावसाने सिंदफणा नदीने रुप धारण केले.सद्यस्थितीत सिंदफणा नदीने धोक्याची पातळी ओलांडली असल्याने पहिल्यांदाच सिंदफणेला पूर आल्याचा सांगण्यात येत आहे.

गोदावरीला दोन महिन्यात तिस–यांदा पाण्याचा विसर्ग

गोदावरी नदीच्या पात्रात दोन महिन्यात तिस–या वेळेस पाणी विसर्ग करण्यात आला आहे.यापूर्वी जवळपास १ लाख १३ हजार क्युसेक तर सद्यस्थितीत एक लाखाहून आधिक क्युसेक पाणी विसर्ग गोदावरीत होत असल्याने नदी काठावरील नागरिक धास्तावले आहेत.

प्रशासन व लोकप्रतिनिधींचे अवाहन

सिंदफणा व गोदावरी नदीच्या पात्रातुन पाणी विसर्ग होत असल्याने प्रशासन अलर्ट झाले असून,गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित,माजी आमदार अमरसिंह पंडित,बाळराजे पवार, यशराज पंडित यांनी नदीकाठावरील नागरिकांनी सतर्क रहावे असे आवाहन केले आहे.

# तलवाडाचे तलाव शभर टक्के भरले पाणी रहदारीच्या रस्त्यावर



तलवाडा (प्रतिनिधी):– गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा उप अध्यक्ष खिजर शेख, जयदेव शिगणे यांनी गेल्या चार महिन्या पासुन बेकायदेशीर गाव तलाव अतिक्रमण काढण्यासाठी लढा उभारला असुन त्यांच्या तक्रारी नंतर बेकायदेशीर अतिक्रमण लोकांना दोन नोटीस देण्यात आल्या असुन लवकरच तिसरी नोटीस देऊन अतिक्रमण काढण्यात येईल असे प्रशासन मार्फत लेखी आश्वासन देण्यात आले असून काल झालेल्या पावसामुळे तेच गाव तलाव शभर टक्के भरले असुन स्वाभिमानी चे शेख खिजर यांना अशी माहिती भेटली की गाव तलाव छत्रपती शिवाजी महाराज चौकात जेसीबी दौरे पाणी काढण्या साठी गावतलाव कोरण्यात येणार आहे त्यामुळे तक्रारदर शेख खिजर हे आक्रमक होऊन त्याच पाण्यात जाऊन कोरून न देण्याचा या भूमिके वर ठाण होते व पाण्यात उभा राहिले त्यानंतर तलवाडा पोलीस स्टेशन चे पीएसआय स्वप्निल कोळी तत्काळ त्या ठिकाणी जाऊन त्याच्याशी चर्चा करून ते बाहेर आले व गाव तलाव धोखा कसा आहे हे त्याच्या निर्धान्यास आणुन दिले

या बाबत सविस्तर माहिती अशी की, गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील गाव तलाव शेजारी मोठ्या प्रमाणात अतिक्रमण करण्यात आले असून आडमाप दुकाने तसेच पक्के दुकाने बांधकाम परवाना नसताना बांधण्यात आले आहे मात्र सात ते आठ दिवसा पासुन सतत होत असल्या पावसा मुळे गाव तलाव पूर्ण पणे भरले असुन ज्या त्या ठिकाणी मुख्य रहदारी चा रस्ता असुन त्या ठिकाणी पाझर निर्माण झाले असून काहीच्या दुकानात पाणी आले असुन मोटारी दारे पाणी काढण्यात येत असुन हे मात्र वरिष्ठांच्या दिसत नाही का? त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात रस्त्यावर पाणी साचले असुन जाण्या येण्यास अडचण निर्माण झाली असुन त्यात जेसीबी दौरे कोणीतरी गाव तलाव कोरत असल्याचे समजल्या नंतर तक्रारदार पाण्यात जाऊन जल समाधी घेत असल्याचे पोलीस स्टेशन चे पीएसआय स्वप्नील कोळी यांनी तात्काळ त्याच्या सोबत बीट अंमलदार काकडे, बीट अंमलदार मोहसीन शेख, दुर्गा दळवी हे तत्काळ त्या ठिकाणी जाऊन त्याच्याशी चर्चा करून तेव्हा ते पाण्यातुन बाहेर आले

## व्यसनमुक्ती अभियानांतर्गत मेळावा

बीड (प्रतिनिधी):– शहरातील व्यसनमुक्ती आधार केंद्रामध्ये भारत सरकारच्या उपक्रमांतर्गत जीवन विद्या मिशन आयोजित व्यसनमुक्ती अभियानांतर्गत भव्य मेळावा घेण्यात आला. या मेळाव्यांना संस्थेचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. युवा पिढी ही राष्ट्राची ऊर्जा आहे समाज आणि देशाच्या विकासासाठी तरुणाईची भूमिका महत्त्वाची असून जास्तीत जास्त तरुणांनी व्यसनमुक्त व्हावे यासाठी व्यसनमुक्ती अभियान राबविण्यात येत आहे. नशा मुक्त भारत अभियाना अंतर्गत समाज कुटुंब मित्र आणि इच्छुक तरुणांनी या मोहिमेत सहभागी होऊन नशा मुक्त राहण्याची प्रतिज्ञा देण्यात आली. यावेळी संस्थेचे तेजस घुमरे, संजय बडगळ सह आदींनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला संस्थेचे पदाधिकारी नागरिक आणि मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## खोलेश्वर मा. विद्यालयात स्पर्धा परीक्षा विद्यार्थी पालक मेळावा उत्साहात

अंबाजोगाई (प्रतिनिधी):– खोलेश्वर मा. विद्यालयात एनएमएमएस,आठवी शिष्यवृत्ती,विज्ञान मंथन परीक्षा संदर्भात इ आठवी पालक मेळावा उत्साहात संपन्न झाला. यावेळी अध्यक्षस्थानी स्थानिक व्यवस्था मंडळाचे कार्यवाह किरण कोदरकर होते. ह्र मंचावर मुख्याध्यापक अनंतराम कोपले, कंगले,उजगरे होते. मुख्याध्यापक अनंतराम कोपले बोलताना म्हणाले की,शालेय अभ्यासक्रम व स्पर्धा परीक्षेच्या संदर्भात शिष्यवृत्ती व एन एमएमएस या परीक्षेचे अभ्यासक्रमा नुसार मार्गदर्शन केले नियमित उपस्थित राहण्याबाबत पालकांनी आवर्जून लक्ष्य द्यावे. आपल्या पाल्यांचा निकाल चांगला लागावा त्याच बरोबर गुणवत्ता पुर्वक यश संपादन करावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली अध्यक्षीय समारोपात किरण कोदरकर म्हणाले की, येणारा काळ हा स्पर्धा परीक्षेचा



काळ असणार आहे विद्यार्थ्यांनी भविष्यातील सर्व आवाहनासाठी तयार असावे व पालक म्हणून पाठिंबा द्यावा त्यांच्या क्षमताबाबत आपण जागृत असावे तसेच ही संस्था शाळा गुणवंतांना घडविणारी असल्याचेही ते म्हणाले कार्यक्रमाचे प्रास्ताविक मेघा कुलकर्णी,संचलन अनुराधा राजंणकर, परीचय मधुकर जाधव, उपस्थितांचेआभार अर्चना घेवारे तर कल्याण मंत्र ज्योती घोडके यांनी सांगितला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



**नेकनुर : नेकनूर मंडळांमधील सफेपूर, तांदळवाडी, वैतागवाडी, अंधापुरी घाट येथे अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे खूप मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.नेकनूरचे उपसरपंच सचिन शिंदे यांनी नुकसानग्रस्त शेतीची पाहणी करून तहसीलदार ,ग्राम महसूल अधिकारी यांना पंचनामे करून लवकरात लवकर मदत करण्यासंदर्भात सूचना केल्या.यावेळी अंधापुरीचे सरपंच पप्पू जगताप, सफेपुरचे माजी सरपंच श्रीराम घोडके ,जगन्नाथ घोडके व परिसरातील शेतकरी उपस्थित होते.**

# श्रीकृष्ण इंग्लिश स्कूल येथे पालक सहविचार सभा संपन्न

धारूर (प्रतिनिधी):– श्रीकृष्ण इंग्लिश स्कूल किल्ले धारूर येथे पालक सहविचार सभेस उत्तुंग प्रतिसाद मिळाला असून परिसरातील पालक शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध व्याख्याते ह भ प ज्ञानेश्वर महाराज सोळंके यांचे अनमोल असे उपस्थित त्यांना मार्गदर्शन झाले. यावेळी लक्ष्मण साखरे सर, हनुमंत शेप साहेब, पत्रकार सचिन थोरात सर, सैनिक राजदीप मुंडे सर यांच्यासह शाळेचे संस्थापक अध्यक्ष श्री राठोड सर , संचालिका सौ. राठोड मॅडम यांचे उपस्थिती लाभली.

सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते विद्येची देवता सरस्वती व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले तसेच उपस्थित सर्व मान्यवरांचा सत्कार सन्मान करण्यात आला.

यानंतर शाळेच्या सहशिक्षिका सौ सावंत मॅडम यांनी प्रास्ताविक सादर केले, व यानंतर कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक ह भ प ज्ञानेश्वर



महाराज सोळंके यांचे मार्गदर्शन झाले यावेळी त्यांनी शालेय परिसर व शाळेची भौतिक सुविधा व विद्यार्थ्यांचे गुणवत्ता याबद्दल समाधान व्यक्त केले. यावेळी त्यांनी पुढील विषयांना हे हात घालत, विद्यार्थी व शिक्षक यामधील संवाद कसा असावा,विद्यार्थ्याचे शालेय परिसरामध्ये वर्तन कसे असायला पाहिजे, विद्यार्थ्यांची शारीरिक स्वच्छता कशी असावी,शिक्षकाची कर्तव्य व जबाबदारी याविषयीही माहिती दिली,विद्यार्थ्यांची कर्तव्य व जबाबदारी काय असते, विद्यार्थ्यांच्या शालेय जीवनात पालकांचा सहभाग कसा असला पाहिजे, विद्यार्थ्यांचे पालक या नात्याने पालकांची जबाबदारी काय आहे.विद्यार्थ्यांचा सोशल मीडियाचा (मोबाईल) वापर व त्याचे दुष्परिणाम याविषयी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी काय केले पाहिजे व स्पर्धा परीक्षांची तयारी कशी केली पाहिजे,याविषयी सुद्धा अनमोल असे मार्गदर्शन केले. मार्गदर्शनाच्या वेळी सर्व उपस्थित पालक एकाग्रतेने ऐकून प्रतिसाद देताना दिसून येत होते.

सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या शिक्षका सौ सिरसट मॅडम यांनी केले, व उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार शाळेच्या ज्येष्ठ शिक्षिका सौ राऊत मॅडम यांनी केले. व पहिल्या सत्रातील कार्यक्रम या ठिकाणी संपन्न झाला. दुपारच्या सत्रामध्ये उपस्थित सर्व पालक शिक्षक व विद्यार्थी यांच्यामध्ये सहविचार सभा आयोजित करण्यात आली, यामध्ये उपस्थित पालकांनी आपल्या पाल्याच्या संबंधात असणाऱ्या समस्या व त्यावरील उपाय याबद्दलची चौकशी शाळेतील संबंधित विभागाचे व विषयाचे शिक्षक यांच्यासोबत विचार विनिमय करून त्यावरील उपाय योजना करण्याच्या दृष्टीने चर्चा करण्यात आली.

सदरील कार्यक्रमाला शाळेतील विद्यार्थी, विद्यार्थ्यांचे पालक, परिसरातील नागरिक पत्रकार बांधव, शाळेतील सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी, तसेच सर्व गाड्यांचे चालक–वाहक व शिपाई मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कोठारबनचे ग्रामस्थ नदीवरील पुलाच्या प्रश्नासाठी आक्रमक

**नदीपात्राच्या वाहत्या पाण्यात बसून आंदोलन केले !**
**नदीपात्रात जाऊन तहसीलदारांनी स्वीकारले निवेदन**
**तीन महिन्याच्या मंजुरी मिळवून देऊन - आश्वासन**
**पुरुषासह युवक महिला वयोवृद्धांचा सहभाग**

वडवणी (प्रतिनिधी):- पूल आमच्या हक्काचा नाही, कुणाच्या बापाचा, शासन- प्रशासन मुर्दाबाद... मुर्दाबाद..., डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो यासह अन्य घोषणा देत आज मौजे कोठारबन येथील ग्रामस्थ आक्रमक होत नदीवरील पूल बांधकामाला तात्काळ मंजुरी मिळावी यामागणीसाठी नदीपात्राच्या वाहत्या पाण्यात ग्रामस्थांनी बसून आंदोलन केले. यावेळी तहसीलदार यांनी नदीपात्रात उतरून ग्रामस्थांचे म्हणणे ऐकून घेत निवेदन स्वीकारले आहे.



वडवणी तालुक्यातील मौजे कोठारबन या गावच्या आंबेडकर वस्तीवर एक लोकसंख्या वास्तव्यास आहे. गावातून यावस्तीवर जाण्यासाठी नदी आहे. पावसाळ्यात यानदीमधून मोठ्या प्रमाणात वाहत्या पाण्याचा संसर्ग होतो. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने या नदीतून वाहत्या पाण्याचा प्रचंड प्रवाह दिसून येत आहे. यावस्तीवरील जनतेचा दळणवळणाचा प्रश्न गंभीर बनला असून शाळातील मुला-मुलींचा प्रश्न देखील बिकट आहे. वाहत्या पाण्यातून ये जा करण्यासाठी मोठी कसरत करावी लागते. तर ह्या प्रश्न गाव अस्तित्वात असल्यापासून जैसे थेच आहे. निवडणुका मागून निवडणुका जातात येतात लोकप्रतिनिधी हा प्रश्न घेऊन आश्वासन देऊन निघून जातात परंतु हा प्रश्न अद्याप पर्यंत तरी सोडवण्याचा कोणी प्रयत्न केला नाही. तर आज या ठिकाणीचे ग्रामस्थ आक्रमक होत थेट नदीपात्राच्या वाहत्या पाण्यात उतरून चक्क आंदोलन केले. सदरील पुलाला तात्काळ मंजुरी मिळावी अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे. तर या आंदोलनाला वडवणी तहसीलदार वैभव महेंद्रकर यांनी भेट देऊन आंदोलन करताना समजावण्याचा प्रयत्न केला परंतु आंदोलन करते पान २ वर...

# पूरग्रस्तांच्या मदतीसाठी आ. विजयसिंह पंडित धावले

**खामगाव आणि नांदूर हवेली येथील पुरातन अडकलेल्या लोकांच्या सुटकेसाठी शर्थीचे प्रयत्न**

गेवराई (प्रतिनिधी) गेवराई विधानसभा मतदारसंघांमध्ये गोदावरी आणि शिंदफणा नदीने उग्र रुप धारण केल्यामुळे परिसरात पूरग्रस्त परिस्थिती गंभीर बनली असून माजी आमदार अमरसिंह पंडित आणि विद्यमान आमदार विजयसिंह पंडित यांनी पूरग्रस्त परिसराचा दौरा करून पूरग्रस्तांना दिलासा दिला. आ. विजयसिंह पंडित यांनी बीड तालुक्यातील आणि गेवराई विधानसभा मतदारसंघातील खामगाव आणि नांदूर हवेली या सिंदफणा नदीच्या पाण्याने वेढलेल्या परिसराला



भेट दिली असून त्यांनी पुरात अडकलेल्या अनेक लोकांची प्रशासनाच्या मदतीने सुटका करण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्यासह प्रशासनातील अधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गेवराई विधानसभा मतदारसंघांमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. नाथसागरातून सोडलेल्या पान २ वर...

# जनतेचा पैसा जनतेसाठी की सरकारी बाबूंना सुविधा पुरवण्यासाठी?

**छत्रपती शिवाजी महाराज चौक ते राजुरी वेस दरम्यान रस्त्याची नोंद कुठल्याही शासकीय कार्यालयात नसताना रस्त्याचे काम कोण करतोय? - अमरजान पठाण**

बीड (प्रतिनिधी):- छत्रपती शिवाजी महाराज चौक ते राजुरी वेस दरम्यान रस्त्याची नोंद कुठल्याही शासकीय कार्यालयाच्या दप्तरी नसताना रस्त्याचे काम कोण करतोय? रस्ता आणि रस्त्याचा निधी मंजूर नसतानाही छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जिल्हा परिषद गेटपर्यंत रस्त्याचे काम होत असेल, तर जनतेच्या पैशाचा वापर जनतेसाठी होतोय की सरकारी बाबूंना सुविधा पुरविण्यासाठी होतोय,असा प्रश्न महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे बीड शहराध्यक्ष अमरजान पठाण यांनी प्रशासनासमोर मांडला आहे.



सविस्तर वृत्त असे की, बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बशीरगंज,राजुरी वेस,कारंजा रोड,बलभीम चौक,जुना बाजार ते कोतवाल वेस पर्यंत रस्त्याचे काम तात्काळ सुरू करण्यात यावे या मागणीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने बीड नगरपरिषद कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालय यांना रीतसर निवेदन देऊन पान २ वर...

# बीड जिल्ह्यात डॉक्टरांकडून गोरगरिबांची लूट

**प्रशासनाकडून कारवाईची मागणी - शेख एहतेशामुद्दीन**

बीड (प्रतिनिधी) बीड जिल्ह्यात खाजगी डॉक्टरांकडून गोरगरिब जनतेची आर्थिक पिळवणूक सुरू असल्याचा आरोप काँग्रेस (आय) पक्षाचे शहर उपाध्यक्ष शेख एहतेशामुद्दीन यांनी केला आहे. रुग्णसेवेच्या नावाखाली गरिबांकडून अवास्तव दराने फी आकारली जात असून, किरकोळ आजारांसाठीही हजारोंच्या बिलांची वसुली होत असल्याचा त्यांनी आरोप केला आहे.



शेख एहतेशामुद्दीन यांनी म्हटले की, जिल्ह्यातील अनेक डॉक्टर स्वतःच्या मेडिकल स्टोअर्सद्वारे औषधांना बाजारभावापेक्षा जास्त दर लावून रुग्णांची आर्थिक लूट करत आहेत. त्यांनी पुढे सांगितले की, ओपीडी फी, एक्स-रे, सोनोग्राफी, सिटी स्कॅन, आयसीयू सुविधा तसेच शस्त्रक्रियांसाठी ठराविक आणि पारदर्शक पान २ वर...

# परळी तालुक्यातील गावांना अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान-शिंदे

परळी (प्रतिनिधी):- बीड जिल्ह्यासह परळी तालुक्यात अतिवृष्टीने झालेल्या बाधीत शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे.तात्काळ पंचनामे करून त्या शेतकऱ्याला आनुदान प्रती हेक्टरी ५०.००० हजार रुपयाची मदत करण्यात यावी.व सरसकट कर्ज माफ करण्यात यावे असी मागणी होत आहे. काल बीड जिल्हाधिकारी कार्यालय येथे माननीय मुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली पूरस्थिती व पान २ वर...



# किल्लेधारूर घाटातील भीषण अपघातात एक ठार, एक गंभीर जखमी

धारूर (प्रतिनिधी):- खामगाव-पंढरपूर पालखी मार्गावर असलेल्या धारूर घाटात सोमवारी सकाळी ११ च्या सुमारास अपघात झाला. या अपघातात एका व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला असून दुसरा गंभीर जखमी झाला आहे. अपघातग्रस्ताला तातडीने धारूर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याची प्रकृती चिंताजनक आहे.



तेलगाव कडून धारूर कडे येत असलेली मोटरसायकल क्रमांक एम एच २४ एके ९६६ व धारूर कडून तेलगाव कडे जाणारा टेम्पो पान २ वर...

# समाजसेवकांचे धाडस;मृत्यूच्या दारातून एका लहान मुलाला दिले नवे जीवन

बीड (प्रतिनिधी):- बीड शहरातील चांदणी चौक परिसरात घडलेली एक घटना आज संपूर्ण शहराला भावूक करून गेली. शहरातील प्रसिद्ध समाजसेवक व भाजप नेते मुसाखान, जावेद भाई आणि अयान हे तिघेही आपल्या नेहमीच्या कार्यात व्यस्त असतानाच अचानक त्यांना हृदय हेलावून टाकणारी घटना दिसली. दगडी छोट्या पुलावरून एक लहान मुलगा घसरून पाण्यात कोसळला आणि त्याच्या डोळ्यांसमोर मृत्यूचा महाभयंकर खेळ उभा राहिला. पाणी खोल होते, प्रवाहही तीव्र होता. छोटा मुलगा पान २ वर...



# अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करणारा नराधम शिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर तात्काळ अटक करा-साबळे

बीड (प्रतिनिधी):- बीड जिल्ह्यामध्ये या अगोदर अनेक महिलांवरती अन्याय अत्याचार झालेला आहे यातच आता शिक्षण विभागांमध्ये अक्षरशः शिक्षण क्षेत्रातील नराधमांच्या राक्षसी चेहरे समोर येत आहेत यातच बीड शहरांमध्ये काही दिवसांपूर्वी झालेल्या शैक्षणिक संकुलन असलेल्या उमाकिरण येथील पवार या खाजगी ट्युशन चालकाचा प्रताप अख्या महाराष्ट्राने पाहिला आहे यातच हे प्रकरण थोड कुठे शांत होत नाही तिथं केजचा गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकरचे प्रकरण समोर आले आहे लक्ष्मण बेडसकरणे नवीमध्ये शिकणाऱ्या मुलीला गाडीमध्ये खाऊन देतो म्हणून एका महिलेच्या मदतीने केज शहराच्या बाहेर घेऊन जातोच कसा असा प्रश्न आता पोलीस शासनाला जनतेला द्यावा लागेल आज दोन पथक तयार केलेले आहेत असे माहिती मिळत आहे परंतु तोच पोलिसांमध्ये जेव्हा लक्ष्मण बेडसकर गुन्हा दाखल चालू करण्याची प्रक्रिया होती तेव्हा त्या ठिकाणावर निघून कसा जातो त्याला सन्मानाची वागणूक कशी दिली जाते असा प्रश्न आता नागरिकांना पडला आहे पोलिसांसमोर नवनीत कॉवतसाहेब यांच्यामध्ये लक्ष घालून आपण याची सखोल चौकशी करावी व आरोपीला तात्काळ बेड्या ठोकाव्यात अशी मागणी यावेळी सामाजिक कार्यकर्त्या आम्रपाली साबळे गायकवाड यांनी केली आहे यात प्रामुख्याने पाहिले तर



केजचा गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांचे कृत्य म्हणजे सबंध शिक्षण व्यवस्थेला फासलेली काळीमा आहे कोणी त्यांचे हितचिंतक म्हणतात की, हे सर्व पान २ वर...

# अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तत्काळ नुकसान भरपाई द्या - ॲड.सुरेश हात्ते



तलवाडा (प्रतिनिधी):- मागील आठ दिवसापासून गेवराई तालुक्यात जोरदार पावसाला सुरुवात झाली असून अतिवृष्टीमुळे व गोदापत्रातील पाण्यामुळे गेवराई तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकांचे पंचनामे करून तत्काळ नुकसानभरपाई देण्यात यावी अशी मागणी जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे तलवाडा गटाचे जिल्हा परिषद सदस्य ड सुरेश हात्ते यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

वदलेल्या निवेदनात म्हटले आहे की, परतीच्या पावसामुळे गेवराई तालुक्यात अतिवृष्टी झाली असून यामुळे शेतकऱ्यांचे आतोनात नुकसान झाले आहे,तसेच गोदापात्रातील पाणी गोदाकाठच्या शेतकऱ्यांच्या शेतात शिरले असल्याने उभ्या पिकाचे नुकसान झाले आहे यामुळे शेतकरी बांधव आर्थिक संकटात सापडला आहे.गेवराई तालुक्यातील गोदाकाठच्या गावांतील शेतात गोदावरी पत्रात सोडलेल्या पाण्यामुळे उभ्या पिकाचे नुकसान झाले असून मागील आठ दिवसापासून अतिवृष्टी सदृश्य पाऊस पडत आहे,या परिस्थितीची पाहणी करण्यासाठी गोदाकाठच्या राजापूर,काठोडा,यासह अनेक गावात जाऊन पाहणी केली असून या पावसाने शेतकऱ्यांच्या शेतातील पिकात पाणी साचले आहे,कापसाच्या वाती पान २ वर...


# अमृता नदीला पूर; धोंडराई गावात पुराचे पाणी, पावन हनुमान मंदिर पाण्याखाली



गेवराई (प्रतिनिधी)पावसाने जोरदार हजेरी लावली आहे बीड जिल्ह्यांमध्ये कालपासून पावसाची धुवाधार सुरू आहे. यामुळे नदी-नाले तुडूंब भरले असून दमदार पावसामुळे बीड जिल्ह्यातील धोंडराई येथील पावन हनुमान मंदिर पूर्णपणे पाण्यात गेल्याने जनजीवन संपूर्णता विस्कळीत झाले आहे. मुसळधार पाऊस सुरु असल्याने अमृता नदीपात्रात पाण्याच्या पातळीत वाढ झाली आहे. त्यामुळे प्रसिद्ध असलेल्या पावन हनुमान मंदिराच्या परिसरात पाण्याने विळखा घातला आहे त्यामुळे अमृता नदीला आलेला पूर पाहण्यासाठी लोकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली आहे. काही अतिउत्साही तरुण पुराच्या पाण्यात उतरुन आनंद घेताना दिसत आहेत.बीड जिल्ह्यात चार- पाच दिवसांपासून जोरदार पाऊस पडत आहे. यामुळे पान २ वर...

# गेवराई नगरपरिषदेचा गलथान कारभारामुळे पावसाचे पाणी चक्क लोकांच्या घरात

गेवराई (प्रतिनिधी) शहरातील सावता नगर भागात रविवार दि . २१ सप्टेंबर रोजी गेवराई शहरात रात्रभर जोरदार पाऊस झाला .या पावसाने शहरातील सर्व रस्त्यांवर पाणीच-पाणी झाले . शहरातील नाल्यांतील घाण पाणी नागरिकांच्या घरात व व्यापाऱ्यांच्या दुकानात घुसले याला जबाबदार नगरपरिषदेचा स्वच्छता विभाग असून जनतेने वारंवार मागणी करूनही पावसाळ्यापूर्वी शहरातील नाल्यांची सफाई झाली नाही त्यामुळे नाल्या तुंबल्याने सर्व घाण कचरा रस्त्यावर बाहेर पडला . या पावसामुळे रस्त्यावरील पाण्यामुळे शहरातील नागरिकांची दैना उडाली त्यामुळे आता तरी गेवराई नगरपरिषदेच्या स्वच्छता विभागाने जागे व्हावे कारण पुढे आणखी मोठा पाऊस येणार असून गेवराई शहरातील तुंबलेल्या नाल्यांमुळे पुन्हा रस्त्यावर पाणी साचून नागरिकांना शहरात वागणे कठीण होईल , तसेच वाहनचालकांचा या रस्त्यावरील साचलेल्या पान २ वर...



हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT